# ज्ञानसागर कोचिंग क्लासेस, अहमदनगर

| इयत्ता – १० वी | सराव परीक्षा क्र. १ | वेळ – ३ तास |
|---|---|---|
| विषय – मराठी | | गुण – ८० |

**प्र.१ अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ७० ते ८० शब्दात लिहा.** ५

१) अधिकाऱ्यांनी प्रजेशी कसे वागावे असे शिवाजी महाराजांना वाटते ?

२) डॉ आंबेडकर यांच्या वडिलांनी त्यांच्यावर कोणते संस्कार केले ?

३) 'म्या साळा सिकनार' या नाट्यप्रवेशाच्या आधारे गण्याच्या गरीब परिस्थितीचे वर्णन करा ?

**ब) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ३० ते ४० शब्दांत लिहा.** ९

१) शेतकऱ्यांवरील कर आकरणीबद्दल महात्मा फुले यांचे काय मत आहे ?

२) 'बालपण सुखाचे असते' असे म्हणणाऱ्या लेखकांना चिं. वि. जोशी ढोंगी का म्हणतात ?

३) शेवंताने बैलजोडीचे स्वागत कसे केले ?

४) भोई मुले मासे पकडण्यासाठी कोणत्या पद्धतीचा उपयोग करत ?

५) 'मोतिला' वाचवण्यासाठी प्रियालने कोणती युक्ती सुचवली ?

६) कुत्र्यांजवळ जाण्यासाठी लेखकाने कोणत्या पद्धतीचा अवलंब केला ?

DNYANSAGAR A'Nagar

**प्र.२ अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ७० ते ८० शब्दात लिहा.** ४

१) संत एकनाथ यांनी वर्णिलेल्या देवाच्या क्रीडा कोणत्या वयातील आहेत ? त्या सर्व क्रीडांचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

२) कवी विंदा करंदीकर यांनी घेणाऱ्यास काय काय घेण्यास सुचविले आहे ?

३) मोहल्ल्याच्या पडझडीची कोणती व्यथा कवी अजीम राही यांनी व्यक्त केली आहे ?

**ब) खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे सुमारे ३० ते ४० शब्दांत लिहा.** ६

१) 'आर्जव' कवितेतील मुलगी आईची कोणती सुखदु:खे जाणते ?

२) शेतकऱ्याला कोणती दु:खे भोगावी लागतात ?

३) कलेची जाणीव नसणाऱ्यांच्या घरातले उत्सव कसे साजरे होतात ?

४) कलहंसाने नळराजाच्या हातून सुटण्याचा कसा प्रयत्न केला ?

**प्र.३ अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.** ४

१) वखर जुंपल्यावर काय झाले?

२) लाहोरला असतांना अण्णा आणि अक्का कोणती वाद्ये शिकत होते?

३) परमपद कशाच्या बळाने प्राप्त होते ?

४) देवाने केव्हा डोळे झाकले असावेत असे कवीला वाटते ?

**ब) पाठ्यपुस्तकातील गद्य-काव्य पाठांच्या आधारे खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून ती वाक्ये / काव्यपंक्ती पुन्हा लिहा.** ४

१) अशी हजारो, लाखो माणसं या -------- सामील झाली होती.

२) खेड्यातल्या -------- झोपड्या जशा आतून मातीनं लिंपून घेतात तसा काहीसा रंग त्यांनी भिंतींना दिला.

३) परी स्वावलंबी कलेचा ----- । बोलवावा प्रत्येकाने ॥

४) जो भागला ----- विशेष केला॥

DNYANSAGAR A'Nagar

प्र.४ अ) **खालीलपैकी कोणत्याही एका वाक्यांचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.** ४

१) 'पापीणी पापिणी : कवणासि बीढार दीधलें। महात्मेनि कुजांतर केलें ।'

२) 'कशाला? वांद्रयाला पोचवायला?'

ब) **खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा.** ४

१) सह्याद्रीच्या कड्याकडून
छातीसाठी ढाल घ्यावी

२) घ्यावें तेव्हा द्यावें ऐसा अससी उदार ।
काय धरुनि देवा तुझे कृपणाचे द्वार ।।

प्र.५ **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ५० ते ६० शब्दांत लिहा.** ८

१) आई आणि बाळू यांच्या नात्यातील गोडवा स्पष्ट करा.

२) काटेवनात मुलांना पक्षी व झाडे यांबद्दल कोणती माहिती मिळाली ?

३) मुलांसाठीच जगणाऱ्या आईवर मरण का ओढवले ?

४) रानबाने मेव्हण्याच्या मागणीला कसा विरोध केला ? का ?

प्र.६ **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा.** १०

१) युगपुरुष – छत्रपती श्रीशिवाजी महाराज  २) आमची सहल

३) विज्ञान आणि मानवी जीवन  ४) मी समाजसेवक झालो। झाले तर...

प्र.७ क) **खालीलपैकी कोणत्याही एका अलंकाराची लक्षणे सांगून उदाहरण लिहा.** २

१) दृष्टांत  २) अनन्वय

ख) **खालीलपैकी कोणतेही चार शब्द शब्दसिद्धीच्या साधित, उपसर्गघटित, प्रत्ययघटित व अभ्यस्त यापैकी कोणत्या प्रकारांत येतात ते लिहा.** २

१) अप्रामाणिक  २) सुपीक

३) शेतकरी  ४) लहाणपण

५) शेजारी पाजारी  ६) बदनाम

ग) **कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे कोणत्याही दोन वाक्यांत बदल करून ती वाक्ये पुन्हा लिहा.** २

१) एका वर्षाचे पन्नास रविवार असे घालविल्यावर चिमणीचे लग्न जमले. (संयुक्त वाक्य करा)

२) वाढत्या वयाच्या मुलांना ताजं, निर्भेळ दूध मिळावं म्हणून म्हैस पाळलेली असे. (केवल वाक्य करा)

३) त्याची दृष्टी सित्यानं त्याच्या हाती दिलेल्या फाटलेल्या पुस्तकावर स्थिरावते (मिश्र वाक्य करा)

ध) **खालील वाक्य लेखन नियमानुसार शुद्ध करून लिहा.** २

१) पाय आपटीत फतिंगराव तेथुन निघुन गेला.

किंवा

**खालील वाक्यात योग्य त्या विरामचिन्हाचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.**

माझे तिचे कसे जुळेल.

च) **खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** २

१) धुसफूस करणे  २) डोळ्यात पाणी उभे राहणे.

३) छल करणे  ४) सूत न जमणे.

प्र.८ क) **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** ४

शाळेचे विद्यार्थी–प्रतिनिधी या नात्याने शाळेतील व्यवसाय मार्गदर्शन परिषदेला मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा उदयोग अधिकारी यांना निमंत्रण पत्र लिहा.

**किंवा**

२) तुमच्या शाळेची सहल दौलताबादचा किल्ला पाहण्यासाठी जाणार आहे. विद्यार्थी–प्रतिनिधी म्हणून तेथील – विश्रामगृह प्रमुखास तुमच्या राहण्याच्या व्यवस्थेसंबंधी माहिती मिळविण्यासाठी चौकशी पत्र लिहा.

ख) **खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वत:च्या भाषेत लिहा.**

बसमध्ये सरांनी सहलीचा उद्देश आम्हाला सांगितला. ''मुलांनो आपल्या पर्यावरणात असंख्य सुंदर पक्षी आहेत, त्यांना आपणा आपल्या प्रदुषित वस्तीत बघु शकत नाही. त्या पक्ष्यांची माहिती घेऊन त्यांचे जवळून प्रत्यक्ष दर्शन आपण घेणार आहोत. शहरातील वृक्षतोड व प्रदूषण यामुळे अलीकडे चिमण्या व कावळेही दिसणं दूर्मीळ झालं आहे. ही शहरं माणसांनी जंगलं तोडून वसवली व पक्ष्यांची मातृभूमी असलेली ही वनं, त्यांचा हक्काचा निवारा आपणच नष्ट केला व पक्ष्यांच जगणच असह्य केलं. हेच पक्षी पर्यावरण संतुलनाच्या कार्यात आपल्याला फार मोठी मदत करतात. झाडांवरचे व प्राण्यांच्या अंगावरचे किटक खाऊन त्यांना निरोगी ठेवतात. तसेच जमिनीवरचेही किडे खाऊन जंगल सुरक्षित ठेवतात. वृक्षसंवर्धन करत ते प्राण्यांनाही जपतात. निसर्गसंपत्तीची हानी न करता त्यांचा हवा तेवढा उपभोग घेतात. निसर्गसंपत्तीचे जतन करतात आणि स्वार्थ आणि परमार्थ कसा साधावा हे आपल्याला शिकवितात.''

DNYANSAGAR
A'Nagar

प्रश्न :–

१) पक्षी पर्यावरण संतुलनाच्या कार्यात कशी मदत करतात? २

२) अलीकडे चिमण्या व कावळ्यांचे दर्शन दुर्मीळ का झाले आहे? १

३) पक्ष्यांकडून आपण काय शिकावे? १

**किंवा**

**वरील गद्य उताऱ्याचा सुमारे एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

ग) **खालील दिलेल्या विषयावर निमंत्रण पत्रिका लिहा.(कोणतेही एक)** ४

१) ज्ञानप्रकाश विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या वृक्षारोपण सोहळयाच्या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी निमंत्रण पत्रिका तयार करा.

२) तुमच्या प्रशालेत होणाऱ्या वक्वृत्त्व स्पर्धेच्या उद्‍घाटनाच्या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका तयार करा.

किंवा

आवेदन पत्र तयार करा.(कोणतेही एक)

१) तुमच्या प्रशालेत रामकिसन जोशी शिपाई या पदासाठी अर्ज करीत आहे या आवेदन पत्राचा नमुना तयार करा.

२) किशोर सपकाळ (शारदा निवास, दादर, मुंबई – १६) सिद्‍धार्थ कॉलेज, मुंबई–६ यांच्याकडे इंग्रजी विषयाच्या अध्यापकाच्या पदासाठी अर्ज करीत आहे या आवेदन पत्राचा नमुना तयार करा.

*****